# प्रेस नोट

**गुन्हा नोंद क्रमांक ८३/२०१६ भा.द.वि. कलम ३७६,४५२,३५४,५०६,(१), ३२३ मधील आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत होवुन शिक्षा झाले बाबत.**

कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ८३/२०१६ भा.द.वि. कलम ३७६,४५२,३५४,५०६,(१), ३२३ प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी पिडीत महिला यांनी फिर्याद दिली की, यातील आरोपी शेषराम रामदत्त मौर्या वय- ३५ वर्षे रा. सुंदर आकाश सोसायटी हडपसर पुणे हा पिसोळी येथिल कुमार ॲन्ड सन्स या स्लायडींग विडो बनविण्याचे कंपनीचा मालक असुन त्या कंपनीत फिर्यादीचे पती राजकुमार मौर्या हे कामगार म्हणुन कामास होते. आरोपी याने त्याचे मालकीचा हिल व्हयु सोसायटी,पिसोळी ता. हवेली पुणे येथील फ्लॅट फिर्यादी व त्यांचे पतीस रहाण्यासाठी दिला होता. दिनांक २७/०२/२०१६ चे सुमारे १५ दिवसांपुर्वी फिर्यादी हया सदर प्लॅटमधे एकटया असताना यातील आरोपी याने फिर्यादी यांचे घरात येवुन फिर्यादीला दमदाटी करुन तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला व त्यानंतर नमुदची गोष्ट कोणास सांगु नकोस असे म्हणुन दमदाटी केली. या मजकुराची फिर्याद दिलेने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करणेंत आला होता.

दाखल गुन्हयाचा तपास तात्कालीन महिला पोलीस उप-निरीक्षक अश्वीनी पाटील व पो.हवा. रविंद्र भोसले, पो.हवा. विशाल गवळी यांनी करुन दाखल गुन्हयातील आरोपीस अटक करुन त्यांचे विरुध्द भौतिक, वैदयकिय व परिस्थीतीजन्य, पुरावे गोळा करुन दाखल गुन्हयांचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर केले.

नमुद गुन्हयाचे सेशन केस क्र. ५३२/२०१६ अन्वये कामकाज मे. आदोणे कोर्ट जिल्हा सत्र न्यायालय पुणे यांचे न्यायालयात चालुन मा. न्यायालयाने दिनांक २१/०६/२०१८ रोजी दाखल गुन्हयातील आरोपी शेषराम रामदत्त मौर्या वय- ३५ वर्षे रा. सुंदर आकाश सोसायटी हडपसर पुणे यांचे विरुध्द आरोपी सिध्द झाल्याने त्यास ७ वर्षे कैद व १५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावलेली आहे. नमुद गुन्हयामध्ये सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. गवळी, यांनी सरकारतर्फे बाजु मांडुन कोर्ट कामकाज पहिरवी अधिकारी श्री. गणेश कुलाल पोलीस उप- निरिक्षक, सहा. पो. फौज. सुनिल कोलते, पो.हवा. राजेद्र नलावडे यांनी पाहीले आहे.